# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

१३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५
दूरध्वनी: ०२२-२२१६ ३९६४/२२१६३९६५, फॅक्स: २२१६३९७६
ई-मेल: mercindia@merc.gov.in
वेब-साईट www.mercindia.org.in/www.merc.gov.in

# जाहीर सूचना

**जाहिरात क्र. : --- / २०१५-१६**

**प्रारुप महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन, त्याचे पालन व नूतनशीलऊर्जा प्रमाणपत्र चौकटीचे कार्यान्वयन) विनियम, २०१६ वर अभिप्राय मागविण्याबाबत**

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचे (मविनिआ) प्रारुप नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन, त्याचे पालन व नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र चौकटीचे कार्यान्वयन विनियम, २०१६ आयोगाच्या www.mercindia.org.in / www.merc.gov.in या संकेत-स्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे.

या प्रारुप विनियमांवर, आयोग लेखी अभिप्राय, सूचना आणि/किंवा हरकती मागवित असून त्या, आयोगाचे सचिव यांना, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, केंद्र क्र.१, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई ४००००५, येथे व्यक्तिशः किंवा पोस्टाने, किंवा फॅक्स किंवा ई-मेल (फॅक्सः०२२-२२१६३९७६, ई-मेलः mercindia@merc.gov.in) द्वारा दि. १९ जानेवारी, २०१६ पर्यंत कृपया पाठविण्यात याव्यात.

या अभिप्राय, सूचना आणि/किंवा हरकतींवर पाठविणाऱ्याचे पूर्ण नाव, पोस्टाचा पत्ता आणि ई-मेलचा पत्ता, असल्यास, देण्यात यावा. जर कोणत्याही संस्था किंवा ग्राहक वर्गवारीच्या वतीने हे अभिप्राय, सूचना आणि/किंवा हरकती पाठविण्यात येत असतील तर तसे नमूद करण्यात यावे.

दिनांक १९ जानेवारी, २०१६ रोजी किंवा त्यापूर्वी प्राप्त झालेले सर्व अभिप्राय, सूचना आणि/ किंवा हरकती प्रारुप विनियमांचा अंतिम मसुदा तयार करण्याआधी आयोगाकडून विचारात घेण्यात येतील.

दिनांक : २४ डिसेंबर, २०१५

ठिकाण : मुंबई

सचिव, मविनिआ